## संपादकीय

## विविधतेचा सन्मान की एकसाची ओढ?



**भारताच्या सांस्कृतिक ओळखीविषयी मोहन भागवत यांनी मांडलेला 'सामायिक सांस्कृतिक व्याकरणा'चा विचार प्रथमदर्शनी समावेशक वाटतो. मात्र या संकल्पनेमागील राजकीय आशय, सामाजिक परिणाम आणि घटनात्मक चौकट तपासल्याशिवाय तो स्वीकारणे धोकादायक ठरू शकते.**

भारतीय समाज ही कोणत्याही एका सूत्रात बांधता येईल अशी रचना नाही. येथे भाषा, धर्म, जाती, परंपरा, सण, श्रद्धा आणि सामाजिक अनुभव यांची इतकी गुंतागुंत आहे की 'एकसंध ओळख' ही कल्पनाच संशयास्पद ठरते. अशा परिस्थितीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत 'सामायिक सांस्कृतिक व्याकरणा'ची संकल्पना पुढे ठेवतात, तेव्हा त्या शब्दांपलीकडील अर्थ तपासणे आवश्यक ठरते. भागवत यांचे म्हणणे असे की भारतीय विविधता ही विस्कळीत नसून एका अंतर्गत सांस्कृतिक व्याकरणाने बांधलेली आहे. ही मांडणी ऐकायला समन्वयी वाटते. विविधता पुसून टाकण्याऐवजी तिला एक समान चौकट देण्याचा हा प्रयत्न असल्याचा दावा केला जातो. मात्र प्रश्न असा आहे की ही चौकट कोण ठरवणार, कोणत्या निकषांवर आणि कोणाच्या अनुभवांच्या आधारे? भारताची ओळख ही हजारो वर्षांच्या संवादातून घडलेली आहे. येथे बौद्ध, जैन, वैदिक, इस्लामी, ख्रिस्ती, आदिवासी अशा अनेक प्रवाहांनी समाज घडवला. ही ओळख वरून लादलेली नाही, तर काळाच्या ओघात तयार झालेली आहे. त्यामुळे 'सांस्कृतिक व्याकरण' ही संकल्पना नैसर्गिक वाटावी, तर ती समाजाच्या तळागाळातील अनुभवांतून येणे आवश्यक आहे. ती एखाद्या संघटित विचारसरणीची भाषिक चौकट ठरली, तर तिचा उपयोग समावेशासाठी कमी आणि वर्चस्वासाठी अधिक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. घटनात्मक पातळीवर भारताने 'एक संस्कृती' नव्हे, तर 'अनेक ओळखी' मान्य केल्या आहेत. भारतीय संविधान धर्मनिरपेक्षता, समता आणि व्यक्तिस्वातंत्र्य या मूल्यांवर उभे आहे. येथे नागरिकाची ओळख ही त्याच्या धर्म, भाषा किंवा सांस्कृतिक परंपरेपेक्षा त्याच्या नागरिकत्वातून येते. अशा वेळी सांस्कृतिक ओळखीला घटनात्मक ओळखीपेक्षा वरचढ मानण्याचा प्रयत्न धोक्याचा ठरतो. 'सामायिक व्याकरण' ही संकल्पना सैद्धांतिक पातळीवर खुली असली, तरी व्यवहारात ती अनेक प्रश्न निर्माण करते. उदाहरणार्थ, कोणती भाषा, कोणते सण, कोणती प्रतीके ही त्या व्याकरणाचा भाग असतील? बहुसंख्याकांच्या प्रथा या आपोआप 'सामायिक' ठरणार का? अल्पसंख्याक, आदिवासी किंवा सीमावर्ती समाजांचे अनुभव या चौकटीत बसतील का? की त्यांना 'वेगळे' म्हणूनच पाहिले जाईल? इतिहास सांगतो की जेव्हा जेव्हा भारतात 'एकसारखेपणा' लादण्याचा प्रयत्न झाला, तेव्हा त्यातून संघर्षच निर्माण झाला. भाषिक चळवळी, प्रांतिक अस्मिता, सामाजिक न्यायाच्या लढाया या सगळ्या विविधतेच्या नाकारण्याविरुद्धच उभ्या राहिल्या. त्यामुळे विविधतेला मान्यता देणे हे केवळ सांस्कृतिक नव्हे, तर राजकीय आणि सामाजिक अपरिहार्यता आहे. भागवत यांचे विचार हे केवळ सांस्कृतिक चिंतनापुरते मर्यादित नाहीत; ते सत्तेच्या केंद्राशी जोडलेले आहेत, ही बाब दुर्लक्षित करता येत नाही. जेव्हा सांस्कृतिक कल्पना राजकीय सत्तेच्या भाषेत उतरतात, तेव्हा त्या तटस्थ राहत नाहीत. त्यांचा उपयोग धोरणे ठरवण्यासाठी, इतिहास मांडण्यासाठी आणि समाजाला 'योग्य-अयोग्य' ठरवण्यासाठी होतो. अशा वेळी 'सामायिक सांस्कृतिक व्याकरण' ही संकल्पना किती समावेशक राहील, याबाबत शंका निर्माण होतात. खरे तर भारताला आज गरज आहे ती सांस्कृतिक एकात्मतेच्या घोषणांपेक्षा सामाजिक न्यायाच्या अंमलबजावणीची. शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि कायद्यापुढील समता या प्रश्नांवर एकत्र येणे अधिक महत्त्वाचे आहे. केवळ सांस्कृतिक ओळखीवर भर दिल्यास आर्थिक आणि सामाजिक विषमता झाकली जाण्याचा धोका असतो. सांस्कृतिक ओळख ही जपायची गोष्ट आहे, परंतु ती संरक्षित करण्याच्या नावाखाली इतर ओळखी दुय्यम ठरवणे हे भारतीय लोकशाहीच्या आत्म्याशी विसंगत आहे. आजच्या अस्थिर आणि ध्रुवीकरणाच्या काळात सांस्कृतिक संकल्पनांना विशेष वजन प्राप्त झाले आहे. मात्र इतिहास साक्ष देतो की भारताला एकत्र ठेवणारे सूत्र कोणतेही एकमेव सांस्कृतिक तत्त्व नव्हते, तर मतभिन्नतेला सहन करण्याची क्षमता होती. म्हणूनच 'सामायिक सांस्कृतिक व्याकरण' ही कल्पना खुली, लवचिक आणि प्रश्नांना सामोरे जाणारी असेल, तरच ती संवादाचे साधन ठरू शकते. ती अंतिम सत्य म्हणून मांडली गेली, तर ती असमतोलाला अधिक धार देण्याचा धोका बाळगते. भारताला आज गरज आहे ती ओळखींच्या मोजणीची नव्हे, तर न्याय, समता आणि विश्वासाच्या पुनर्बांधणीची.

# द्वेषभाषणाचा व्हिडिओ आणि सत्तेची जबाबदारी

**» राजकारणात भाषण हे साधन असते, पण तेच भाषण समाजात द्वेष, भीती आणि बहिष्कार पसरवू लागले की प्रश्न प्रचाराचा न राहता लोकशाहीच्या आरोग्याचा बनतो. अलीकडील एका व्हिडिओने सत्ताधाऱ्यांच्या शब्दांची आणि कृतींची जबाबदारी पुन्हा ऐरणीवर आणली आहे.**

लोकशाहीत सत्ता ही केवळ अधिकारांचा संच नसते, ती जबाबदारीची अखंड परीक्षा असते. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाषा अधिक धारदार होते, प्रतिमा अधिक टोकाच्या होतात आणि राजकीय संदेश थेट भावनांवर घाव घालू लागतात. अशा काळात सत्ताधारी नेतृत्वाकडून येणारा प्रत्येक शब्द, प्रत्येक दृश्य, प्रत्येक संकेत हा केवळ समर्थकांसाठी नसून संपूर्ण समाजासाठी असतो, हे विसरले जाणे धोकादायक ठरते.

आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांच्या नावाशी जोडलेल्या एका व्हिडिओने हाच प्रश्न उपस्थित केला आहे. त्या व्हिडिओमधील प्रतिकात्मक हिंसा, विशिष्ट समुदायाकडे निर्देश करणारी दृश्यरचना आणि आक्रमक संदेश यामुळे केवळ राजकीय वाद निर्माण झाला नाही, तर सार्वजनिक चर्चेचा स्तरच खाली घसरला. नंतर तो व्हिडिओ हटवण्यात आला, स्पष्टीकरणे देण्यात आली; पण प्रश्न इतक्यावर थांबत नाही. लोकशाहीत चूक झाली की ती पुसून टाकणे पुरेसे नसते, तिची जबाबदारी स्वीकारणे आणि परिणामांचा सामना करणे आवश्यक असते.

द्वेषभाषणाची व्याख्या काय, यावर कायदेशीर वाद असू शकतो. पण राजकीय नैतिकतेचा निकष काय, हा प्रश्न अधिक मूलभूत आहे. एखाद्या मुख्यमंत्र्याच्या अधिकृत किंवा अर्ध-अधिकृत संवादातून जर समाजातील एका घटकाला 'लक्ष्य' केल्याचा भास निर्माण होत असेल, तर तो निव्वळ गैरसमज म्हणून झटकून टाकता येत नाही. कारण सत्तास्थानी असलेल्यांच्या शब्दांना वजन असते; ते शब्द समाजात खोलवर झिरपतात.

भारतीय संविधानाने अभिव्यक्तिस्वातंत्र्य दिले आहे, पण त्यासोबतच समता, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठेचे मूल्यही अधोरेखित केले आहे. अभिव्यक्ती ही स्वैराचारासाठी नाही, तर संवादासाठी आहे.



राजकीय भाषण हे मतभेद मांडण्यासाठी असते, द्वेष उभा करण्यासाठी नव्हे. जेव्हा प्रचाराच्या नावाखाली भीतीचे, हिंसेचे किंवा बहिष्काराचे संकेत दिले जातात, तेव्हा ते संविधानाच्या आत्म्याशी थेट संघर्ष करतात. या घटनेत आणखी एक चिंताजनक बाब म्हणजे 'हटवले म्हणजे संपले' असा सत्ताधाऱ्यांचा सूर. डिजिटल युगात काहीही कायमचे पुसले जात नाही. एकदा प्रसारित झालेला संदेश लोकांच्या मनात आपला ठसा उमटवतो. तो ठसा किती खोल आहे, याचा अंदाज सत्ता कदाचित कमी लेखते. पण समाजात आधीच असलेली तणावाची बीजे अशा संदेशांमुळे अधिक जोमाने उगवतात.

राजकीय नेत्यांनी वारंवार असा दावा केला आहे की त्यांचा लढा विकासाचा आहे, रोजगाराचा आहे, राष्ट्रीय सुरक्षेचा आहे. मग प्रश्न असा पडतो की हे मुद्दे मांडण्यासाठी द्वेषाची भाषा का लागते? विरोधकांवर टीका करणे हा लोकशाहीचा भाग आहे, पण संपूर्ण समुदायालाच संशयाच्या कठड्यावर उभे करणे हे लोकशाहीला कमकुवत करणारे आहे. अशा पद्धतीने राजकारण केल्यास तात्कालिक राजकीय फायदा मिळू शकतो, पण दीर्घकालीन सामाजिक नुकसान निश्चित आहे. या प्रकरणात विरोधकांनी तीव्र प्रतिक्रिया दिली, हे अपेक्षितच होते. मात्र खरी कसोटी सत्ताधाऱ्यांची आहे. सत्तेत असलेल्यांनी स्वतःसाठी उच्च निकष लावले पाहिजेत. मुख्यमंत्री, पंतप्रधान किंवा कोणताही घटनात्मक पदाधिकारी हा केवळ पक्षाचा नेता नसतो; तो संपूर्ण राज्याचा, देशाचा प्रतिनिधी असतो. त्यामुळे त्याच्या संवादातून संयम, प्रगल्भता आणि समावेशकता दिसली पाहिजे.

भारतीय राजकारणाचा आजचा प्रवास पाहिला, तर असे वाटते की शब्दांची धार वाढत आहे, पण विचारांची खोली कमी होत आहे. सोशल मीडियाच्या तात्काळ प्रतिसादाच्या हव्यासात राजकीय संवाद अधिक उथळ, अधिक आक्रमक बनतो आहे. हे केवळ एका पक्षापुरते मर्यादित नाही; पण सत्ताधाऱ्यांकडून येणाऱ्या संदेशांचा परिणाम अधिक व्यापक असतो, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही.

या पार्श्वभूमीवर प्रश्न उरतो तो एवढाच की, आपण कोणत्या प्रकारची लोकशाही घडवत आहोत? मतदारांना भीती दाखवून, द्वेष भडकवून मिळवलेली सत्ता किती टिकाऊ असते? आणि समाजात कायमस्वरूपी दुभंगण निर्माण करून मिळवलेला राजकीय विजय नेमका कुणाचा पराभव ठरतो?

# रन टू फीड मॅरेथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद अडीच हजारांहून अधिक धावपटू सहभागी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** आरोग्य, व्यायाम आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम असलेली 'रन टू फीड' धावस्पर्धा पिंपरी येथील बालासाहेब कुंजीर क्रीडांगणावर मोठ्या उत्साहात पार पडली. इस्कॉन बीसीईसी पुण्याच्या 'फूड फॉर लाईफ' उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत अडीच हजारांहून अधिक नागरिकांनी सहभाग नोंदवला.



टर्निंग माईल्स इन टू मील्स या उद्देशाने आयोजित या धावस्पर्धेत एक, दोन, तीन, पाच, दहा आणि एकवीस किलोमीटर अशा विविध अंतरांच्या शर्यती घेण्यात आल्या. शालेय विद्यार्थी, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच नियमित धावपटू अशा सर्व वयोगटांतील स्पर्धकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. महिलांच्या सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष महिलांसाठीची स्वतंत्र शर्यत घेण्यात आली. महिलांच्या आरोग्य, आत्मविश्वास आणि सक्षमीकरणाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला महिलांचा मोठा प्रतिसाद लाभला. अनेक महिलांनी कुटुंबासह सहभाग घेत सामाजिक कार्याला पाठिंबा दिला.

धावस्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे सहकार्य लाभले. सहभागी धावपटूंच्या सुरक्षिततेसाठी वैद्यकीय पथके, स्वयंसेवक, पाणीपुरवठ्याची व्यवस्था तसेच वाहतूक नियंत्रणाची योग्य आखणी करण्यात आली होती. त्यामुळे संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध आणि सुरक्षित वातावरणात पार पडला.

समाजातील गरजू घटकांसाठी अन्नदानाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. समाजहितासाठी एकत्र येऊन केलेला हा उपक्रम नागरिकांमध्ये सकारात्मक संदेश देणारा ठरला आहे.

# काळाच्या ओघात टिकणारी अजरामर रचना असावी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** वास्तुकला म्हणजे केवळ इमारती उभारणे नव्हे, तर माणसाच्या जगण्यावर, विचारांवर आणि भावनांवर परिणाम करणारी सर्जनशील प्रक्रिया आहे. आजच्या पिढीने केवळ झगमगाटासाठी किंवा सामाजिक माध्यमांवर प्रसिद्धीसाठी डिझाइन करू नये, तर ती रचना काळाच्या ओघात इतिहासात नोंदली जाईल अशी असावी, असे प्रतिपादन आमदार अमित गणपत गोरखे यांनी केले.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या फर्ग्युसन महाविद्यालयात आयोजित 'एलिव्हेशन २०२६' या उपक्रमात ते विद्यार्थ्यांशी संवाद साधत होते. यावेळी मोठ्या संख्येने भावी वास्तुविशारद आणि अंतर्गत सजावट शिकणारे विद्यार्थी उपस्थित होते.

देशाची प्रगती केवळ आकडेवारीतून मोजता येत नाही, तर ती नागरिकांच्या अनुभवातून दिसते, असे सांगत गोरखे म्हणाले की, ताजमहाल, अजिंठा-वेरूळसारख्या वास्तू आजही आपल्याशी संवाद साधतात. पूर्वजांनी निसर्गाशी संघर्ष न करता संवाद साधत वास्तू उभारल्या, ही परंपरा पुढे नेणे गरजेचे आहे.

बजेट आणि वेळ वाचवण्यासाठी केलेले तडजोडीचे डिझाइन भविष्यात अडचणी निर्माण करते. म्हणून केवळ आधुनिक नव्हे, तर माणसाला केंद्रस्थानी ठेवणारी संवेदनशील शहरे उभारण्यावर भर द्यावा, असे त्यांनी सांगितले. २०४७ चा समृद्ध भारत भाषणांनी मोठा होणार नाही, तर तो भक्कम 'फाऊंडेशन'वर उभा राहील. या भविष्याचा पाया रचण्याची जबाबदारी माझ्या समोर बसलेल्या तरुण पिढीची आहे. तुम्ही केवळ इमारती उभारणार नाही, तर भारताची समृद्ध संस्कृती उभारणार आहात, अशा शब्दात त्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.

# मनपा शाळेतील 'कला मेळा' ठरला आकर्षणाचा केंद्रबिंदू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शिक्षण विभागांतर्गत श्रीमती अनुसयाबाई नामदेव वाघेरे माध्यम शाळा, पिंपरी येथे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणाऱ्या 'कला मेळा'चे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना सर्जनशील अभिव्यक्तीसाठी व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने राबविण्यात आलेला हा उपक्रम नागरिकांच्या विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत मेळ्याचे उद्घाटन झाले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांनी साकारलेल्या कलाकृती पाहून त्यामागील संकल्पना, विचार आणि सादरीकरणाबाबत विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

वारली कलेतून शनिवारवाडा, गोंड चित्रकलेतून गेट वे ऑफ इंडिया, तसेच प्रसिद्ध चित्रकार एस. एच. रझा यांच्या शैलीपासून प्रेरित गावजीवन अशी विविध विषयांवरील कलाकृती विद्यार्थ्यांनी सादर केल्या. या मेळ्याची संकल्पना पारंपरिक आणि लोककला अशी असून महापालिकेच्या सुमारे ३० शाळांमधील विद्यार्थ्यांनी विविध त्रिमितीय नमुने साकारले.

या कला मेळ्याचे आयोजन महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त श्रावण हार्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

# शहरात अतिक्रमण विरोधी व्यापक कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** महापालिका सार्वत्रिक निवडणूक कालावधीत पिंपरी-चिंचवड शहरातील आठही क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत व्यापक अतिक्रमण कारवाई करण्यात आली.

या कारवाईत एकूण १४३ अनाधिकृत बांधकामे हटविण्यात आली असून १ हजार २६० फलक, १३ हजार ९७ केऑक्स, ११५ हातगाड्या, ६० टपऱ्या तसेच २ हजार ९९५ टेबल, वजन काटे, खुर्च्या, बाकडे, झेंडे व इतर साहित्य जप्त करण्यात आले, अशी माहिती अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त अतुल पाटील यांनी दिली.



आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या नियंत्रणाखाली ही कारवाई करण्यात आली.

या मोहिमेत अतिक्रमण निरीक्षक, बीट निरीक्षक, सुरक्षा दलाचे जवान आणि पोलीस प्रशासन सहभागी होते. महापालिका प्रशासनाने नागरिकांना सार्वजनिक रस्ते, पदपथ व मोकळ्या जागांवर अतिक्रमण करू नये, असे आवाहन केले असून नियमभंग करणाऱ्यांविरोधात भविष्यातही कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा दिला आहे.

# आधुनिक पिंपरी-चिंचवडसाठी भाजपचे नवे नेतृत्व सज्ज

## पिंपरी चिंचवड भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांचे प्रतिपादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** महानगरपालिकेच्या निवडणुकीत मिळालेल्या ऐतिहासिक विजयानंतर भारतीय जनता पक्षाने शहराच्या विकासासाठी पुढील पाच वर्षांचा आराखडा आखण्यास सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर नवनिर्वाचित महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिलाताई बाबर आणि सभागृह नेते प्रशांत शितोळे यांचा भाजपच्या वतीने मोरवाडी येथील शहर मध्यवर्ती कार्यालयात सत्कार करण्यात आला. हा कार्यक्रम केवळ सत्कारापुरता मर्यादित न राहता, आगामी 'विकास पर्वा'चा प्रारंभ ठरल्याचे चित्र होते.




शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमास माजी खासदार अमर साबळे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, महिला मोर्चा अध्यक्ष सुजाता पालांडे, माजी महापौर राहुल जाधव यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, नवनिर्वाचित नगरसेवक-नगरसेविका आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी विजयाचे श्रेय कार्यकर्त्यांना दिले. शहराध्यक्ष म्हणून कार्यकर्त्यांनी एकजुटीने पक्षाला मिळवून दिलेल्या या यशाचा अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले. केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना शहरातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे हेच नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे प्रमुख उद्दिष्ट असेल. पिंपरी-चिंचवडला देशातील आदर्श शहर म्हणून उभे करण्यासाठी भाजप कटिबद्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

सत्काराला उत्तर देताना महापौर रवि लांडगे यांनी महापौरपद ही जबाबदारी असल्याची भावना व्यक्त केली. २४ तास पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, स्मार्ट सिटी अंतर्गत प्रकल्पांना गती देणे, तसेच अनधिकृत बांधकामे आणि शास्तीकरासंबंधी प्रश्नांवर ठोस उपाययोजना करण्यावर भर दिला जाईल, असे त्यांनी सांगितले.

उपमहापौर शर्मिलाताई बाबर यांनी महिलांच्या सक्षमीकरणावर लक्ष केंद्रित करण्याची भूमिका मांडली. महिलांची सुरक्षितता, स्वावलंबन, महापालिकेच्या शाळांचा दर्जा उंचावणे आणि आरोग्य सुविधा सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणणे ही आपली प्राधान्ये असल्याचे त्यांनी सांगितले. सभागृह नेते प्रशांत शितोळे यांनी पारदर्शक आणि गतिमान प्रशासन हेच भाजपचे ध्येय असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सत्कारानंतर झालेल्या विशेष बैठकीत संघटनात्मक कार्यक्रम आणि विकासकामांच्या नियोजनावर चर्चा झाली.

# मिसिंग लिंक प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर गॅस टँकरच्या भीषण अपघातानंतर तब्बल ३२ तास दोन्ही दिशांची वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आणि राज्याच्या आर्थिक नसांना जणू लकवा बसला. आयटी कर्मचारी, रुग्णवाहिका, मालवाहतूक, पर्यटक हजारो लोक या एका घटनेमुळे अडकले. या अपघाताने केवळ वाहतूकच नाही, तर महामार्गावरील सुरक्षितता, आपत्कालीन व्यवस्थापन आणि पर्यायी मार्गांच्या अभावावर गंभीर प्रश्न उपस्थित केले.

याच पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा चर्चेत आला आहे मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील 'मिसिंग लिंक' प्रकल्प जो गेली अनेक वर्षे फाईल्स, डेडलाईन्स आणि घोषणांमध्ये अडकलेला होता.

खंडाळा घाटातील धोकादायक वळणं, तीव्र उतार आणि अपघातप्रवण पट्टा वगळण्यासाठी हा प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला आहे.

६,६९५ कोटी रुपयांचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प खोपोली ते कुसगाव दरम्यान थेट बोगदे (टनेल) आणि उंच पूल (व्हायाडक्ट) उभारतो. परिणामी घाटमार्ग टाळला जाईल आणि मुंबई-पुणे प्रवासाचा वेळ तब्बल २५ ते ३० मिनिटांनी कमी होणार आहे. पण वेळेइतकंच महत्त्वाचं म्हणजे हा मार्ग आपत्कालीन परिस्थितीत पर्यायी मार्ग ठरू शकतो.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### मुळशी तालुक्यात राष्ट्रवादीचे वर्चस्व

**पौड :** मुळशी तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या तीन जागांपैकी दोन जागांवर राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार)ने विजय मिळविला. एका जागेवर भाजपचा उमेदवार विजयी झाला. पंचायत समितीत सहापैकी तीन जागा राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार)ला, तर दोन जागा राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला मिळाल्या. भाजपला एका जागेवर समाधान मानावे लागले. मुळशी तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत पौड-अबंडवेट जिल्हा परिषद गटातून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे मिलिंद नंदकुमार वाळंज हे ५२९७ मतांनी विजयी झाले.

### वाहनाच्या धडकेत जवानाचा मृत्यू

**पिंपरी :** पुणे–सोलापूर महामार्गावर रस्ता ओलांडत असताना अज्ञात वाहनाने दिलेल्या जोरदार धडकेत मराडेवाडी (ता. इंदापूर) येथील केंद्रीय राखीव पोलिस दलातील जवानाचा जागीच मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना लोणी देवकर (ता. इंदापूर) ग्रामपंचायत हद्दीतील तोंडेवस्तीजवळ रविवारी रात्री सुमारे अकराच्या सुमारास घडली. महादेव दादा नाझीरकर (वय -३४, रा. मराडेवाडी, ता. इंदापूर) असे अपघातात मृत्युमुखी पडलेल्या जवानाचे नाव आहे. ते केंद्रीय राखीव पोलिस दलात कार्यरत असून सध्या मुंबई येथे सेवेत होते. सुटीसाठी ते रविवारी आपल्या गावी मराडेवाडी येथे आले होते. पुणे–सोलापूर महामार्गावरील लोणी देवकर येथील तोंडेवस्तीजवळ त्यांचे वडील त्यांना घेण्यासाठी आले होते. यावेळी रस्ता ओलांडत असताना अज्ञात वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. यात, महादेव नाझीरकर यांचा जागीच मृत्यू झाला. सोमवारी दुपारी शासकीय इतमामात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात वृद्ध आई-वडील, पत्नी व मुले असा परिवार आहे.

### आमदार बाबाजी काळे यांच्या नेतृत्वावर विश्वास कायम

# खेड पंचायत समितीवर उबाठाचे वर्चस्व

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** खेड तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या निकालात शिवसेना (उबाठा) गटाने आपले वर्चस्व कायम राखत पंचायत समितीवर पुन्हा एकदा सत्ता मिळवली आहे. सोमवारी (दि. ९) झालेल्या मतमोजणीनंतर तालुक्यातील ८ जिल्हा परिषद गटांपैकी ५ गटांवर आणि १६ पंचायत समिती गणांपैकी ९ गणांवर शिवसेना (उबाठा) गटाचे उमेदवार विजयी झाले. या निकालामुळे आमदार बाबाजी काळे यांच्या नेतृत्वाला मतदारांनी स्पष्ट कौल दिल्याचे चित्र दिसून आले.



अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसला ३ जिल्हा परिषद गटांमध्ये तसेच ६ पंचायत समिती गणांमध्ये यश मिळाले. माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीने काही ठिकाणी चुरशीची लढत दिली, मात्र बहुमतासाठी आवश्यक असलेली आघाडी मिळवण्यात पक्ष अपयशी ठरला. एकनाथ शिंदे गटाच्या शिवसेनेला यावेळी केवळ एका पंचायत समिती गणात यश मिळाले. भाजप तसेच शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसला मात्र या निवडणुकीत एकही जागा जिंकता आली नाही.

२०१७ च्या निवडणुकीत पंचायत समितीवर शिवसेनेचा झेंडा फडकला होता. यंदाच्या निकालानेही तीच परंपरा कायम राहिली आहे. मेदनकरवाडी–काळुस, नाणेकरवाडी–महाळुंगे, वाडा–वाशेरे, कडूस–चास, रेटवडी–वाफगाव, पिंपळगाव तर्फे खेड, पाईट–आंबेठाण आणि कुरुळी–आळंदी ग्रामीण या गटांमध्ये अनेक ठिकाणी अत्यंत अटीतटीच्या लढती झाल्या. काही ठिकाणी मतांचा फरक हजारांच्या आत राहिला, तर काही गटांत विजयी उमेदवारांनी मोठी आघाडी घेतली. या निकालामुळे खेड तालुक्यातील राजकीय समीकरणांमध्ये शिवसेना (उबाठा) गटाची पकड अधिक मजबूत झाल्याचे स्पष्ट झाले आहे. पंचायत समितीवर सत्ता कायम राखल्याने आगामी काळात तालुक्यातील विकासकामे आणि राजकीय हालचालींवर शिवसेना (उबाठा) गटाचा प्रभाव राहणार असल्याचे चित्र आहे.

### पाईट–आंबेठाण गटात बहिणीचा पराभव

# आमदार बाबाजी काळेंना धक्का

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** पुणे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक २०२६ च्या निकालात खेड तालुक्यातील पाईट–आंबेठाण जिल्हा परिषद गट विशेष चर्चेत राहिला. या गटात अत्यंत अटीतटीची व तिरंगी लढत पाहायला मिळाली. अखेर राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या अधिकृत उमेदवार सुनीता शरद बुट्टे पाटील यांनी ३९९ मतांच्या फरकाने विजय मिळवत बाजी मारली. या निकालामुळे आमदार बाबाजी काळे यांना मोठा राजकीय धक्का बसला आहे. या गटातून आमदार बाबाजी काळे यांच्या बहिणी राजश्री जैद यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाकडून निवडणूक लढवली होती. तसेच एकनाथ शिंदे गटाकडून निशा गोरे या उमेदवार रिंगणात होत्या. मतमोजणीच्या प्रत्येक फेरीत चढउतार सुरू होते. काही काळ राजश्री जैद आघाडीवर होत्या, तर काही फेऱ्यांमध्ये सुनीता बुट्टे पाटील यांनी आघाडी घेतली. अखेर शेवटच्या फेरीत सुनीता बुट्टे पाटील यांनी निर्णायक आघाडी घेत विजय निश्चित केला. माजी जिल्हा परिषद सदस्य शरद बुट्टे पाटील यांच्या पत्नी असलेल्या सुनीता बुट्टे पाटील यांनी या गटावर असलेली बुट्टे कुटुंबाची राजकीय पकड कायम ठेवली आहे. त्यांच्या विजयामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेसने या भागात आपले स्थान पुन्हा अधोरेखित केले आहे.

खेड तालुक्यात एकूण जिल्हा परिषद गटांमध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाने पाच जागा जिंकून वर्चस्व राखले असले, तरी पाईट–आंबेठाण गटातील पराभव आमदार बाबाजी काळे गटासाठी मोठी नामुष्की मानली जात आहे. त्यामुळे “गड आला, पण सिंह गेला” अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. पुणे जिल्हा परिषदेत राष्ट्रवादी कॉंग्रेसने एकहाती सत्ता मिळवली असून, खेड तालुक्यातील पंचायत समितीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे वर्चस्व आहे. मात्र पाईट–आंबेठाण गटातील हा निकाल स्थानिक राजकारणात विशेष महत्त्वाचा ठरला आहे. विजयाच्या आनंदात राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांनी परिसरात जल्लोष साजरा केला.

# हवेलीतील ४९ ग्रामपंचायतींवर प्रशासकराज

### लोणी काळभोर, उरुळी कांचनचाही समावेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** हवेली तालुक्यातील लोणी काळभोर, उरुळी कांचन यांच्यासह लहान-मोठ्या एकूण ४९ ग्रामपंचायतींवर मंगळवारपासून प्रशासकराज लागू करण्यात आला आहे. फेब्रुवारी २०२६ अखेर संबंधित ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपुष्टात आल्याने लोकनियुक्त सरपंच व सदस्यांचे अधिकार आजपासून समाप्त झाले असून, पुढील निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत ग्रामपंचायतींचा कारभार प्रशासकांकडे सोपवण्यात आला आहे.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ मधील कलम १५१ (१) (क) तसेच सन २०२० च्या महाराष्ट्र अध्यादेशातील तरतुदीनुसार, नैसर्गिक आपत्ती, महामारी अथवा प्रशासकीय कारणांमुळे ग्रामपंचायत निवडणुका घेणे शक्य नसल्यास शासनाला प्रशासक नियुक्तीचे



अधिकार आहेत. या तरतुदींनुसार शासन निर्णयाद्वारे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना प्रशासक नियुक्तीचे अधिकार देण्यात आले आहेत.

या अधिकारांचा वापर करून पुणे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी पंचायत समिती हवेली अंतर्गत मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींसाठी प्रशासकांची नियुक्ती केली आहे. नियुक्त प्रशासकांनी तातडीने पदभार स्वीकारून ग्रामपंचायतींचा दैनंदिन व प्रशासकीय कारभार सुरळीतपणे चालवावा, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

नियुक्त प्रशासकांना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ आणि ग्रामपंचायत लेखा संहिता २०११ नुसार सरपंचांचे सर्व अधिकार व कर्तव्ये पार पाडावी लागणार आहेत. मात्र, नव्याने निवडून आलेली व विधीग्राह्य ग्रामपंचायत अस्तित्वात येताच प्रशासकपद आपोआप समाप्त होईल. प्रशासकांकडून गैरवर्तन, कर्तव्यात कसूर किंवा कोणतीही आक्षेपार्ह बाब आढळून आल्यास संबंधित प्रशासकाला तात्काळ पदावरून हटवण्याचे अधिकार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना असतील, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# अजितदादांचा शब्द बारामतीकरांनी राखला

### राष्ट्रवादीचा सहापैकी सहा जागांवर दणदणीत विजय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामती :** बारामती तालुक्यात झालेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेसने आपले निर्विवाद वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. जिल्हा परिषदेच्या सहापैकी सर्व सहा जागांवर राष्ट्रवादीच्या उमेदवारांनी विजय मिळवत बारामतीतील आपली मजबूत पकड कायम राखली.

पंचायत समिती निवडणुकीतही राष्ट्रवादी कॉंग्रेसने दहा पैकी आठ जागांवर यश मिळवले असून उर्वरित दोन जागांवर भारतीय जनता पक्षाचे उमेदवार विजयी झाले आहेत.

दिवंगत नेते अजित पवार यांच्या निधनानंतर झालेल्या या पहिल्याच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकडे राज्याचे लक्ष लागले होते. प्रचाराचा कालावधी कमी असतानाही आणि भावनिक वातावरण असतानाही बारामतीतील मतदारांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या उमेदवारांना मोठ्या प्रमाणावर पाठिंबा दिला. या निकालातून



बारामतीकरांनी ‘अजितदादांचा शब्द’ जपल्याचे स्पष्ट होत असल्याची भावना कार्यकर्त्यांत व्यक्त होत आहे.

सुपा गटामध्ये राष्ट्रवादीच्या पल्लवी प्रमोद खेत्रे ह्या १४,५५३ मताधिक्याने विजयी झाल्या. त्यांना १८,०९५ मते मिळाली. अपक्ष उमेदवार मोहिनी गणेश खैरे यांना ३,५४२ मते मिळाली. भाजपच्या वंदना विशाल कोकरे येथे तिसऱ्या स्थानी राहिल्या. त्यांना २,६७७ मते मिळाली.

गुणवडी गटामध्ये राष्ट्रवादीच्या शुभांगी कचेर शिंदे १७,२४९ मतांनी विजयी झाल्या. शिंदे यांना १८,४५३ मते मिळाली, तर पराभूत बसपच्या ऊर्मिला प्रवीण शिंदे यांना १,२०४ मते मिळाली.

पणदरे गटातून राष्ट्रवादीचे मंगेश प्रतापराव जगताप हे १७,५३६ मतांनी विजयी झाले. जगताप यांना २०,८०० मते मिळाली, तर त्यांचे प्रतिस्पर्धी भाजपचे सुरज अरविंद जगताप यांना ३,२६४ मते मिळाली.

वडगाव निंबाळकर गटातून राष्ट्रवादीच्या रोहिणी संदीप कदम (ढोले) ह्या २१,५३६ मतांनी विजयी झाल्या. रोहिणी कदम यांना २२,५७२ मते मिळाली. त्यांच्या प्रतिस्पर्धी भाजपच्या पराभूत उमेदवार आरती मधुकर लोखंडे यांना १,०३६ मते मिळाली.

निंबुत गटातून राष्ट्रवादीचे करण संभाजीराव खलाटे हे १९,५२४ मतांनी विजयी झाले. खलाटे यांना २२,१८१ मते मिळाली. त्यांचे प्रतिस्पर्धी पराभूत भाजप उमेदवार दिग्विजय वसंतराव काकडे यांना २,६५७ मते मिळाली.

निरावागज गटातून राष्ट्रवादीच्या शिवानी अभिजित देवकाते ह्या २०,५४४ मतांनी विजयी झाल्या. देवकाते यांना २१,६१३ मते मिळाली. त्यांचे प्रतिस्पर्धी पराभूत अपक्ष उमेदवार रोहित राजू भोसले यांना १,०६९ मते मिळाली.

गेल्या अनेक वर्षांत तालुक्यात राबवण्यात आलेली सिंचन व्यवस्था, रस्ते, औद्योगिक प्रकल्प तसेच इतर विकासकामे यामुळे अजित पवार यांचे नेतृत्व बारामतीत किती प्रभावी होते, हे या निकालातून पुन्हा अधोरेखित झाल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे. निकालानंतर विजयी उमेदवारांनी कोणताही जल्लोष न करता उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेतली. यावेळी दिवंगत अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. या भावनिक प्रसंगी अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती या संस्था स्थानिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या मानल्या जातात. या संस्थांवर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे स्पष्ट वर्चस्व राहिल्याने बारामती तालुक्यातील विकासकामांची गती पुढील काळातही कायम राहील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून पाहणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील सर्वार्थाने प्रगतशील गाव म्हणून ओळख असणाऱ्या व ग्रामपंचायतच्या माध्यमातून विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात अग्रेसर असणाऱ्या जवळे (ता. आंबेगाव) येथे मुख्यमंत्री पंचायत राज अभियान निमित्त ग्रामपंचायत स्तरावर राबविण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांची पाहणी करण्यासाठी जिल्हा परिषद पुणे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) भूषण जोशी जिल्हा परिषद पुणे, समवेत पंचायत समिती आंबेगाव गटविकास अधिकारी अर्चना कोल्हे, विस्तार अधिकारी रंगनाथ हजारे यांच्या वतीने ग्रामपंचायतीने केलेल्या विविध कामांचा आढावा घेण्यात आला.



यामध्ये ग्रामपंचायत कार्यालय, ग्रामपंचायत मध्ये सुरू असलेली ऑनलाइन प्रणाली, नवनवीन उपक्रम, वृक्ष संवर्धन, दिशादर्शक फलक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जवळे येथील विद्यार्थ्यांचे अध्यापन, सुरू असलेली घरकुल योजना याचा आढावा घेण्यात आला.

तसेच अंगणवाडी या ठिकाणी असणाऱ्या सर्व सोयी सुविधांची पाहणी करण्यात आली. यावेळी गावच्या आदर्श सरपंच वृषाली उत्तम शिंदे पाटील, ग्रामपंचायत अधिकारी शिला साबळे, बचत गट प्रतिनिधी चंद्रकला गायकवाड, अंगणवाडी सेविका शालन सोनवणे, आशा वर्कर सुनंदा शिंदे, भूपेंद्र वाळुंज व ग्रामस्थ आदी यावेळी उपस्थित होते.

### जेजुरी गडावर बैल उधळल्याने चेंगराचेंगरी

**पिंपरी :** जेजुरी गडावर रविवारी एका बेजबाबदार कृत्यामुळे मोठा अनर्थ ओढवल्याची घटना घडली. नवस फेडण्यासाठी आणलेले दोन शर्यतीचे बैल अरुंद पायऱ्यांवर अचानक उधळल्याने गडावर मोठी चेंगराचेंगरी झाली. या थरारक घटनेत तीन भाविक गंभीर जखमी झाले आहे.

बुलढाणा आणि जळगाव येथून काही भाविक दर्शनासाठी आले होते. त्यांनी नवस फेडण्यासाठी दोन बैल गडावर आणले होते. वास्तविक, जेजुरी गडाच्या मुख्य भागात कोणतेही प्राणी नेण्यास सक्त मनाई आहे. मात्र नियमांकडे दुर्लक्ष करत त्यांनी जुन्या पायरी मार्गाने बैल वर नेण्याचा प्रयत्न केला. भाविकांच्या गर्दीत अचानक हे बैल उधळले. पायऱ्यांवरून वेगाने खाली धावणाऱ्या बैलांमुळे भाविकांमध्ये एकच घबराट पसरली. जीव वाचवण्यासाठी भाविकांनी सैरावैरा धाव घेतली. त्यात तीन भाविक गंभीर जखमी झाले.

# आंबेगाव पूर्व भागात दुष्काळाची तीव्रता वाढली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील लोणी-धामणी परिसरात दुष्काळाच्या झळा पुन्हा जाणवू लागल्या आहेत. मांदळेवाडी, वडगावपीर, पहाडदरा तसेच परिसरातील वाड्या-वस्त्यांमध्ये पाण्याची तीव्र टंचाई भासू लागल्याने शेतातील उभी पिके सुकण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

चालू वर्षी मे महिन्यापासून पावसाने चांगली हजेरी लावल्यामुळे या भागातील ओढे-नाले भरून वाहत होते. जानेवारी अखेरपर्यंत काही ठिकाणी ओढ्यांमध्ये पाणी टिकून होते. मात्र फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यातच ओढे आटू लागले असून अनेक ठिकाणी ते पूर्णपणे कोरडे पडले आहेत. परिणामी विहिरी व विंधन विहिरींची पातळी झपाट्याने घटत असून शेतीसाठी पाणी कमी पडू



लागले आहे.

आंबेगाव तालुक्याचा हा पूर्व भाग दरवर्षी दुष्काळग्रस्त म्हणून ओळखला जातो. पिण्याच्या पाण्यासह शेतीसाठी पाण्याची कायमची समस्या या गावांना भेडसावत आहे. दरवर्षी पाहणी व सर्वेक्षण होतात, मात्र ठोस उपाययोजना होत नसल्याची खंत ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था कशीबशी केली जाते; मात्र शेतीसाठी पाण्याचा प्रश्न कायम अनुत्तरितच असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

मार्च ते मे या कालावधीत पाणीटंचाईमुळे शेतकरी शेतीपासून दूर राहतात. सध्या फेब्रुवारी अखेरपर्यंतच पाणी पुरेल, असा अंदाज आहे. पुढील महिन्यांत जनावरांसाठी हिरवा चारा मिळवण्यासाठी दहा ते वीस किलोमीटर अंतर पार करावे लागते. या भागाला शेतीसाठी पाणी मिळणार का? याचे उत्तर शोधता शोधता एक पिढी म्हातारपणाकडे झुकली हे मात्र नक्की.

### सहानुभूतीची लाट, कार्यकर्त्यांचे संघटित प्रयत्न आणि मतदारांची साथ यामुळे भरभरून मते

# आंबेगावात राष्ट्रवादी कॉंग्रेसचा झंझावात, सर्वपक्षीय आघाडी अपयशी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुर्दैवी निधनानंतर निर्माण झालेली सहानुभूतीची लाट, कार्यकर्त्यांचे संघटित प्रयत्न आणि मतदारांची साथ यामुळे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेसने घवघवीत यश मिळवले. विरोधी पक्षांनी एकत्र येत राष्ट्रवादीला आव्हान देण्याचा प्रयत्न केला; मात्र मतदारांनी ही आघाडी स्पष्टपणे फेटाळून लावली. या निकालातून आंबेगाव तालुक्यावर राष्ट्रवादीची पकड पुन्हा एकदा ठळकपणे सिद्ध झाली असून विरोधकांसाठी आत्मचिंतनाची वेळ आली आहे.

नुकत्याच झालेल्या मंचर नगरपंचायत निवडणुकीत शिंदेसेनेला अपेक्षेपेक्षा चांगले यश मिळाल्याने विरोधकांच्या आशा उंचावल्या होत्या. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका जाहीर होण्यापूर्वीच विरोधकांनी एकत्रित रणनीती आखत शिंदेसेना, उद्धवसेना यांना सोबत घेऊन निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम यांच्या पुढाकारातून ही सर्वपक्षीय आघाडी मैदानात उतरली. दुसरीकडे राष्ट्रवादी कॉंग्रेसने सर्व जागा स्वबळावर लढवण्याचा निर्णय घेतला. अनेक जुन्या उमेदवारांना पुन्हा संधी दिल्याने पक्षाला फटका बसेल, अशी चर्चा होती. मंचर नगरपंचायत निवडणुकीत भाजप व राष्ट्रवादीची युती झाली होती; मात्र त्याचा फटका दोन्ही पक्षांना बसल्याने यावेळी ही युती झाली नाही. स्वबळावर लढणाऱ्या भाजपाला अनेक ठिकाणी उमेदवार शोधताना कसरत करावी लागली. परिणामी प्रत्यक्ष लढत ही राष्ट्रवादी विरुद्ध सर्वपक्षीय आघाडी अशीच झाली. शिंदेसेनेला अपेक्षेपेक्षा अधिक आत्मविश्वास होता, तर शरद पवार गटाला विधानसभा निवडणुकीप्रमाणे मुसंडी मारण्याची अपेक्षा होती. उद्धवसेनेलाही अस्तित्व दाखवण्याची संधी वाटत होती. मात्र निकालाने या सर्व अपेक्षांना छेद दिला.

निवडणुकीच्या सुरुवातीच्या टप्प्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस काहीशी बॅकफुटवर असल्याचे चित्र होते. मतदारांमध्ये नकारात्मकता जाणवत होती. मात्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर परिस्थिती बदलली. सहानुभूतीची लाट पसरली आणि ‘श्रद्धांजली म्हणून राष्ट्रवादीला मतदान’ हे आवाहन मतदारांना भावले. माजी मंत्री दिलीप वळसे पाटील प्रचारासाठी आले नाहीत तसेच त्यांनी मतदानही केले नाही. प्रमुख नेत्यांच्या अनुपस्थितीत म्हाडाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील तसेच दुसऱ्या फळीतील नेते व कार्यकर्त्यांनी प्रचाराची जबाबदारी सांभाळली. दुर्दैवी घटनेमुळे सभा, रॅली झाल्या नाहीत. घराघरांत जाऊन शांतपणे प्रचार करण्यात आला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची पारगाव येथे प्रचारसभा झाली; मात्र तिचा फारसा परिणाम निकालावर झाला नाही. या निवडणुकीत नातेगोते, मित्रपरिवार आणि गावकुस हा घटक निर्णायक ठरला. जिल्हा परिषदेच्या तीन व पंचायत समितीच्या आठ जागा जिंकून राष्ट्रवादी कॉंग्रेसने तालुक्यात आपला दबदबा कायम राखला.

म्हाडाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील यांना या निकालाचा फटका बसला आहे. जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अरुण गिरे आणि माजी सदस्य तुलसी भोर यांना पराभव स्वीकारावा लागला. राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष विष्णू काका हिंगे यांनी विजय खेचून आणत सर्वांचे लक्ष वेधले. या निकालाने विरोधकांना आत्मपरीक्षणाची गरज अधोरेखित झाली आहे. तीन प्रमुख पक्ष एकत्र येऊनही अपेक्षित यश न मिळाल्याने पुढील काळात त्यांना नवी रणनीती आखावी लागणार आहे.

# दौंड तालुक्यात राष्ट्रवादीचा दबदबा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**दौंड :** पुणे जिल्हा परिषदेच्या दौंड तालुक्यातील सात जागांसाठी ७ तारखेला झालेल्या निवडणुकीत मतदारांनी आपली ताकद दाखवली. माजी आमदार रमेश थोरात यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी कॉंग्रेसने सहा जागांवर विजय मिळवला, तर आमदार राहुल कुल यांच्या भाजपाला यवत – बोरीभडक गटातील जागा मिळाली. राहू – खामगाव, वरवंड – पारगाव, कानगाव – गोपाळवाडी, देऊळगाव राजे – खडकी, कुरकुंभ – पाटस आणि बोरीपार्धी – केडगाव या सहा गटांत राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या उमेदवारांना मतदारांनी पसंती दिली.

पूर्वीच्या निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेसने पाच जागा जिंकल्या होत्या, तर भाजपाला फक्त राहू गटातील जागा मिळाली होती. या वेळी भाजपाला यवत गटाची जागा राखण्यात अपयश आले; येथे अविनाश कुदळे विजयी झाले, तर राष्ट्रवादी कॉंग्रेसचा सागर शेलार यशस्वी ठरला. केडगाव गटातून चिरंजीव तुषार थोरात यांना माजी आमदार रमेश थोरात यांच्यासाठी विजय मिळवणे महत्वाचे होते. सुरवातीला पिछाडीवर असलेले तुषार थोरात अंतिम फेरीत मोठ्या फरकाने विजयी झाले. खडकी गटात राष्ट्रवादी कॉंग्रेसचे विरधवल जगदाळे यांनी सुरुवातीची आघाडी टिकवली आणि भाजपात गेलेल्या आप्पासाहेब पवार यांचा पराभव केला. वरवंड – पारगाव गटातून गायत्री विशाल खळदकर, गोपाळवाडी गटातून साहेबराव पोळ, पाटस गटातून अनुराधा शितोळे यांना मतदारांनी विजयी ठरवले. राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून आक्षेप नोंदवल्याने निर्णय जरा उशिरा झाला.

## सारांश वृत्त

### बारामुल्लामध्ये ड्रग्ज तस्करांना अटक



**श्रीनगर :** जम्मू आणि काश्मीरच्या बारामुल्ला जिल्ह्यात पोलिसांनी मंगळवारी वेगवेगळ्या कारवाईत दोन कथित ड्रग्ज तस्करांना अटक केली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. एका पोलिस प्रवक्त्याने सांगितले की, पट्टण पोलिस ठाण्याच्या पथकाने गस्त घालत असताना काकापोराहून खोरे-शीराबादकडे जाणाऱ्या एका संशयास्पद व्यक्तीला अडवले. झडती दरम्यान, शकील अहमद भट असे ओळखल्या जाणाऱ्या संशयिताच्या ताब्यातून २८ ग्रॅम चरससारखे पदार्थ जप्त करण्यात आले.

### आयुष डॉक्टरांच्या पगारात वाढ

**भुवनेश्वर**: मुख्यमंत्री मोहन चरण माझी यांनी मंगळवारी ओडिशातील राष्ट्रीय आरोग्य अभियान (एनएचएम) अंतर्गत काम करणाऱ्या कंत्राटी आयुष डॉक्टरांच्या पगारात वाढ करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली, असे म्हटले आहे. मुख्यमंत्री कार्यालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सेवा कालावधीनुसार ही वाढ दरमहा २०,००० ते ४०,००० रुपयांपर्यंत असेल. ५ वर्षांपेक्षा कमी अनुभव असलेल्या डॉक्टरांना २० हजारांची वाढ मिळेल आणि मूळ वेतन आता ५६,१४८ रुपये होईल, असे त्यात म्हटले आहे.



### कोलकाता मेट्रोच्या सेवांवर परिणाम

**कोलकाता**: मंगळवारी दुपारी तांत्रिक बिघाडामुळे कोलकाता मेट्रोच्या ग्रीन लाईनवरील सेवा विस्कळीत झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. दुपारी ३.३० च्या सुमारास सेंट्रल पार्क स्टेशनवर सिग्नलिंग सिस्टीममध्ये समस्या आल्याने सेवांवर परिणाम झाला, असे त्यांनी सांगितले. सध्या बंगाल केमिकल आणि हावडा मैदान दरम्यान सेवा उपलब्ध आहेत, असेही त्यांनी सांगितले.

## ११८ खासदारांच्या स्वाक्षऱ्यांसह विरोधकांची नोटीस

# लोकसभा अध्यक्षांविरोधात 'अविश्वास'

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना त्यांच्या पदावरून हटविण्यासाठी काँग्रेससह विविध विरोधी पक्षांनी मंगळवारी (१० फेब्रुवारी) लोकसभा सचिवालयात अविश्वास प्रस्तावाची अधिकृत सूचना सादर केली. काँग्रेस सूत्रांनुसार, लोकसभेतील काँग्रेसचे मुख्य प्रतोद के. सुरेश यांनी ही नोटीस लोकसभा महासचिव उत्पल कुमार सिंह यांना त्यांच्या कार्यालयात दिली. या प्रस्तावावर एकूण ११८ खासदारांच्या स्वाक्षऱ्या असून, त्यात काँग्रेसचे ९९ खासदार सहभागी आहेत.

नियमांनुसार, लोकसभा अध्यक्षांविरुद्ध दाखल करण्यात आलेल्या या अविश्वास प्रस्तावातील आरोपांची प्राथमिक तपासणी केली जाईल. त्यानंतर सचिवालय या सूचनेवर पुढील प्रक्रिया राबविण्याबाबत निर्णय घेईल. हा प्रस्ताव संविधानाच्या कलम ९४(क) अंतर्गत दाखल करण्यात आला असून, सभागृहाचे कामकाज पक्षपाती पद्धतीने चालविल्याचा गंभीर आरोप अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यावर करण्यात आला आहे.

नोटिशीत म्हटले आहे की, अध्यक्ष सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांना चर्चेसाठी पुरेसा वेळ देतात, मात्र विरोधी पक्षांच्या नेत्यांना बोलण्याची संधी नाकारली जाते. अनेक वेळा त्यांना अनावश्यकपणे थांबवले जाते किंवा चर्चेत व्यत्यय आणला जातो, असा आरोपही करण्यात आला आहे. विशेषतः २ आणि ३ फेब्रुवारी रोजी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावर सुरू असलेल्या चर्चेदरम्यान लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना बोलू देण्यात आले नाही, याचा तपशील नोटिशीत नमूद करण्यात आला आहे.

लोकसभा अध्यक्षांविरुद्ध अविश्वास प्रस्ताव आणण्याची ही पहिलीच वेळ नाही. स्वातंत्र्यानंतर आतापर्यंत अध्यक्षांविरुद्ध तीन वेळा असे प्रस्ताव मांडले गेले आहेत, मात्र एकही मंजूर झालेला नाही. पहिला अविश्वास प्रस्ताव डिसेंबर १९५४ मध्ये लोकसभेचे पहिले अध्यक्ष जी. व्ही. मावळंकर (गणेश वासुदेव मावळंकर) यांच्याविरुद्ध आणण्यात आला होता. समाजवादी पक्षाचे नेते आणि बिहारचे खासदार विघ्नेश्वर मिश्रा यांनी हा प्रस्ताव मांडला होता, परंतु सुमारे दोन तासांच्या चर्चेनंतर तो फेटाळण्यात आला.

दुसरा अविश्वास प्रस्ताव १९६६ मध्ये तत्कालीन लोकसभा अध्यक्ष सरदार हुकुम सिंग यांच्याविरुद्ध समाजवादी नेते मधु लिमये यांनी मांडला होता. हा प्रस्तावही बहुमताअभावी मंजूर होऊ शकला नाही. त्यानंतर १९८७ मध्ये तत्कालीन अध्यक्ष बलराम जाखड यांच्याविरुद्ध माकपचे खासदार सोमनाथ चॅटर्जी यांनी तिसरा अविश्वास प्रस्ताव मांडला, मात्र त्याचेही मागील प्रस्तावांसारखेच अपयश झाले.

आता चौथ्यांदा, काँग्रेसच्या पुढाकाराने ओम बिर्ला यांच्याविरुद्ध अविश्वास प्रस्ताव आणण्यात आला आहे. नियमांनुसार, अध्यक्ष स्वतः सभागृहाचे कामकाज चालवत नसतील तर या प्रस्तावाची तपासणी १४ दिवसांनंतर केली जाईल. बिर्ला यांच्याविरुद्धच्या तीन पानांच्या नोटिशीवर काँग्रेस नेते के. सी. वेणुगोपाल यांची पहिली स्वाक्षरी असून, त्यानंतर द्रमुकचे टी. आर. बालू आणि समाजवादी पक्षाचे धर्मेंद्र यादव यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## सरमा यांचा काँग्रेसविरुद्ध ५०० कोटींचा दावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**गुवाहाटी :** आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी काँग्रेस नेते जितेंद्र सिंह, भूपेश बघेल आणि गौरव गोगोई यांच्याविरुद्ध ५०० कोटी रुपयांचा मानहानीचा दावा दाखल केला आहे. दुसरीकडे, काँग्रेसकडून मुख्यमंत्र्यांविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी करत पोलिस तक्रार नोंदवण्यात आली आहे.

"माझ्याविरुद्ध पत्रकार परिषदेतून खोटे, दुर्भावनापूर्ण आणि बदनामीकारक आरोप करण्यात आले. या आरोपांमुळे माझ्या प्रतिमेला धक्का पोहोचला आहे. त्यामुळे काँग्रेस नेते जितेंद्र सिंह, भूपेश बघेल आणि गौरव गोगोई यांच्याविरुद्ध ५०० कोटी रुपयांच्या नुकसानभरपाईचा दावा दाखल केला आहे," असे मुख्यमंत्री सरमा यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे. मात्र, त्यांनी आरोपांचे सविस्तर स्वरूप स्पष्ट केलेले नाही.

दरम्यान, काँग्रेसचे आमदार सिबामोनी बोरा आणि दिगंत बर्मन यांनी गुवाहाटीतील दिसपूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. ही तक्रार भाजप आसाम प्रदेशच्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवरून शेअर करण्यात आलेल्या, नंतर हटवण्यात आलेल्या एआय-निर्मित व्हिडिओसंदर्भात आहे.

तक्रारीनुसार, ७ फेब्रुवारी २०२६ रोजी शेअर करण्यात आलेल्या या व्हिडिओमध्ये मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांना प्रतीकात्मक स्वरूपात मुस्लिम समुदायावर अगदी जवळून गोळीबार करत असल्याप्रमाणे दाखवण्यात आले होते. बंगाल वंशाच्या मुस्लिम समुदायाला लक्ष्य करणारा असून त्यांना 'मिया' किंवा 'बांगलादेशी' अशी अपमानास्पद लेबले लावली जातात, असे तक्रारीत म्हटले आहे.

## जम्मूत दगड क्रशर राजकारण्यांचेच!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**श्रीनगर :** जम्मू आणि काश्मीर केंद्रशासित प्रदेशातील किमान ३१ दगड क्रशर प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरीत्या राजकारणी आणि नोकरशहांच्या मालकीचे असल्याचा धक्कादायक खुलासा मंगळवारी विधानसभेत करण्यात आला. भाजप आमदार डॉ. नरिंदर सिंग रैना यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना उपमुख्यमंत्री व खाणमंत्री सुरिंदर सिंग चौधरी यांनी हा अहवाल सादर केला.

चौधरी यांनी दिलेल्या लेखी उत्तरात स्पष्ट केले की, या ३१ दगड क्रशरपैकी अनेक युनिट्सवर राजकीय नेते आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांचा थेट किंवा अप्रत्यक्ष प्रभाव आहे.

जिल्हानिहाय पाहता, आठ दगड क्रशर जम्मू जिल्ह्यात, सहा कठुआत, चार उधमपूरमध्ये, चार पूंछमध्ये, तीन रियासीमध्ये असून सांबा, राजौरी, किश्तवार, रामबन, गंदरबल आणि कुपवाडा जिल्ह्यात प्रत्येकी एक दगड क्रशर आहे.

या ३१ दगड क्रशरपैकी २९ जम्मू विभागात असून केवळ दोन काश्मीर खोऱ्यात असल्याची माहितीही विधानसभेत देण्यात आली. याशिवाय, रामबन, रियासी, किश्तवार, राजौरी, पूंछ, उधमपूर, पुलवामा आणि कुपवाडा या जिल्ह्यांमध्ये एकूण ४८ दगड क्रशर युनिट्स नियमभंग आणि अन्य कारणांमुळे बंद करून सील करण्यात आल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, अनेक भागांतून दगड क्रशर निवासी वस्तीच्या जवळ असल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्याचेही सभागृहाला सांगण्यात आले. या क्रशरमुळे होणारे धूळप्रदूषण, आवाज आणि पर्यावरणीय नुकसान याचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर आणि दैनंदिन जीवनावर होत असल्याने संबंधित युनिट्स बंद करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

## लोकसभा अध्यक्षांविरोधात एकही ठराव मंजूर नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पदावरून हटवण्यासाठी अनेक विरोधी पक्षांनी एकत्र येत ठराव आणण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. मंगळवारी दुपारी विरोधी पक्षांच्या सदस्यांनी यासंदर्भातील सूचना लोकसभा सचिवालयाकडे सादर केली. लोकसभा सचिवालयातील सूत्रांनी सांगितले की, या सूचनेची नियमांनुसार तपासणी केली जाईल आणि त्यानंतर पुढील प्रक्रिया राबवली जाईल. यापूर्वीही लोकसभा अध्यक्षांना हटवण्याचे प्रयत्न झाले आहेत; मात्र आजवर कोणताही ठराव मंजूर झालेला नाही.

लोकसभा अध्यक्षांना पदावरून हटवण्यासाठी ठराव मांडण्याकरिता किमान दोन सदस्यांची स्वाक्षरी आवश्यक असते. कितीही सदस्यांनी या सूचनेवर स्वाक्षरी केली तरी चालते; मात्र दोन सदस्यांची अट अनिवार्य आहे. सभागृहातील सर्व सदस्यांच्या साध्या बहुमताने असा ठराव मंजूर झाल्यास अध्यक्षांना पदावरून हटवता येते. संविधानाच्या कलम ९४ (क) मध्ये लोकसभा अध्यक्षांना हटवण्याची तरतूद करण्यात आली आहे. बहुमत ठरवताना उपस्थित आणि मतदान करणाऱ्या सदस्यांची नव्हे, तर रिक्त जागा वगळता सभागृहाच्या एकूण प्रभावी सदस्यसंख्येची गणना केली जाते, असे माजी लोकसभा सरचिटणीस पी. डी. टी. आचार्य यांनी स्पष्ट केले. ही सूचना लोकसभेच्या महासचिवांकडेच सादर करावी लागते. प्राथमिक टप्प्यात ठरावातील मजकूर तपासण्यात येतो. त्यामध्ये अत्यंत विशिष्ट आणि स्पष्ट आरोप आहेत का, तसेच कोणतीही बदनामीकारक भाषा वापरली आहे का, याची खात्री केली जाते. ठोस आरोप नसतील तर ठराव स्वीकारार्ह ठरत नाही. संविधानाच्या कलम ९६ नुसार, ठराव चर्चेला आल्यास अध्यक्षांना सभागृहात स्वतःच्या बचाव करण्याची संधी दिली जाते. सामान्यतः ठरावाची भाषा उपसभापती तपासतात; मात्र सध्याच्या लोकसभेत उपसभापती नसल्याने अध्यक्षांच्या पॅनेलमधील सर्वात ज्येष्ठ सदस्य ही जबाबदारी पार पाडू शकतात.

तपासणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ठराव सभागृहात मांडला जातो. नियमांनुसार, सूचना सादर झाल्यानंतर किमान १४ दिवसांनी तो सभागृहाच्या विचारार्थ येऊ शकतो. त्यानंतर सभापती सदस्यांना ठरावाला परवानगी द्यायची आहे का, याबाबत विचारतात. किमान ५० सदस्यांनी समर्थनार्थ उभे राहिल्यास ठराव चर्चेसाठी स्वीकारला जातो आणि १० दिवसांच्या आत त्यावर निर्णय घ्यावा लागतो.

## बांगलादेशात हिंदू व्यापाऱ्याची दुकानात हत्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ढाका :** बांगलादेशच्या मयमनसिंग जिल्ह्यातील त्रिशाल उपजिल्ह्यात अज्ञात हल्लेखोरांनी एका ६२ वर्षीय हिंदू व्यापाऱ्याची त्याच्याच दुकानात घुसून निर्घृण हत्या केल्याची घटना सोमवारी रात्री घडली. या घटनेची माहिती पोलिसांनी मंगळवारी दिली.

त्रिशाल पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी मुहम्मद फिरोज हुसेन यांनी दिलेल्या माहितीनुसार, बोगरा बाजार चौकात असलेल्या दुकानात ही हत्या झाली. पीडित व्यापारी सुसेन चंद्र सरकार हे 'भाई भाई एंटरप्राइझ' या दुकानाचे मालक असून, ते साउथकांडा गावचे रहिवासी होते. हल्लेखोरांनी सरकार यांच्यावर धारदार शस्त्रांनी हल्ला केला. त्यांना गंभीर जखमी अवस्थेत दुकानातच सोडून देण्यात आले आणि दुकानाचे शटर तोडून आरोपी पळून गेले. कुटुंबीय शोध घेत दुकानात पोहोचले असता, सरकार हे रक्ताच्या थारोळ्यात पडलेले आढळले. त्यांना तातडीने मयमनसिंग मेडिकल कॉलेज रुग्णालयात नेण्यात आले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. सुसेन यांचे पुत्र सुजन यांनी सांगितले की, "माझ्या वडिलांचा कोणाशीही वैयक्तिक वाद किंवा शत्रुत्व नव्हते. निर्घृणपणे हत्या केल्यानंतर गुन्हेगारांनी दुकानातून लाखो रुपये लुटले." त्यांनी दोषींना त्वरित अटक करून कठोर शिक्षा देण्याची मागणी केली आहे.

ही हत्या बांगलादेशातील अल्पसंख्याक समुदायांवर होत असलेल्या हिंसक घटनांच्या मालिकेतील नवी घटना मानली जात आहे. बांगलादेशात हिंदू हे अल्पसंख्याक असून, देशाच्या सुमारे १७ कोटी लोकसंख्येपैकी अंदाजे १.३१ कोटी (सुमारे ८ टक्के) हिंदू आहेत.

दरम्यान, बांगलादेशमध्ये १२ फेब्रुवारी रोजी संसदीय निवडणुका होणार असून, ऑगस्ट २०२४ मधील व्यापक आंदोलनानंतर आणि शेख हसीना यांच्या पदच्युतीनंतर होणारी ही पहिलीच निवडणूक आहे.

## सर्वोच्च न्यायालयाचा केंद्राला तपासाचा आदेश

# बेपत्ता मुलांमागे नेटवर्क आहे का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** देशभरात वाढत असलेल्या मुलांच्या बेपत्ता होण्याच्या घटनांमागे संघटित, देशव्यापी नेटवर्क कार्यरत आहे का, याची चौकशी करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला दिले आहेत. अशा घटना एखाद्या विशिष्ट राज्यापुरत्या मर्यादित आहेत की संपूर्ण देशात एकाच पद्धतीने घडत आहेत, याचा सखोल अभ्यास करण्याची गरज असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती उज्जल भुयान यांच्या खंडपीठाने म्हटले की, गेल्या काही दिवसांत मुलांच्या बेपत्ता होण्याच्या मोठ्या प्रमाणावर बातम्या समोर आल्या आहेत. या घटनांमध्ये काही समान पॅटर्न आहे का, परस्परांमध्ये काही संबंध आहे का, की त्या पूर्णपणे स्वतंत्र स्वरूपाच्या आहेत, याचा शोध घेणे अत्यावश्यक आहे. यासाठी केंद्र सरकारने सर्व राज्यांकडून माहिती गोळा करावी, असे आदेश न्यायालयाने दिले.

केंद्र सरकारच्या वतीने अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ऐश्वर्या भाटी यांनी न्यायालयाला सांगितले की, काही राज्यांकडून बेपत्ता मुलांची माहिती प्राप्त झाली असून प्रलंबित प्रकरणांची सद्यस्थितीही मागवण्यात आली आहे. मात्र अजूनही सुमारे डझनभर राज्यांकडून माहिती येणे बाकी आहे. सर्व डेटा प्राप्त झाल्यानंतरच त्याचे विश्लेषण करता येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. यावर खंडपीठाने विचारले की, "यामागे देशव्यापी नेटवर्क आहे का, की हे केवळ राज्य पातळीवर घडत आहे? या घटनांमध्ये काही ठरावीक नमुना किंवा संबंध दिसतो का?"

न्यायालयाने अपहरणातून सुटका झालेल्या मुलांच्या मुलाखती घेण्याचाही सल्ला केंद्र सरकारला दिला आहे. अशा मुलांकडून माहिती घेतल्यास या घटनांमागे कोण कार्यरत आहे, याचा अंदाज येऊ शकतो, असे न्यायालयाने नमूद केले. तसेच, अद्याप माहिती न दिलेल्या राज्यांच्या भूमिकेवर न्यायालयाने नाराजी व्यक्त केली असून आवश्यक असल्यास कठोर आदेश देण्याचा इशाराही दिला आहे. केंद्र सरकारने सर्व राज्यांकडून माहिती मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे न्यायालयाला सांगितले.

ही सुनावणी एका स्वयंसेवी संस्थेने दाखल केलेल्या याचिकेवर होत आहे. यापूर्वी, ९ डिसेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला गेल्या सहा वर्षांतील देशभरातील मुलांच्या बेपत्ता होण्याचा संपूर्ण डेटा संकलित करण्याचे आदेश दिले होते. गृह मंत्रालयाला हा डेटा गोळा करण्यास सांगण्यात आले होते, तसेच तो महिला व बाल विकास मंत्रालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचे निर्देशही देण्यात आले होते.

न्यायालयाने लक्ष वेधले की, गेल्या वर्षी १८ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध झालेल्या एका अहवालानुसार देशात दर आठ मिनिटांनी एक मूल बेपत्ता होत आहे. ही अत्यंत गंभीर समस्या असून तिच्या गुंतागुंतीचा विचार करता अशा प्रकरणांना प्रभावीपणे हाताळण्यासाठी ठोस आणि समन्वयित यंत्रणा उभारण्याची गरज असल्याचे न्यायालयाने अधोरेखित केले आहे.

## पोलिसांविरुद्ध एफआयआर दाखल करण्यास स्थगिती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**प्रयागराज :** २०२४ मध्ये संभल येथे झालेल्या पोलिस गोळीबार प्रकरणात कथित भूमिकेबद्दल संभलचे माजी सर्कल ऑफिसर अनुज चौधरी आणि संभल कोतवालीचे माजी प्रभारी निरीक्षक अनुज तोमर यांच्यासह १२ पोलिस कर्मचाऱ्यांविरुद्ध एफआयआर नोंदवण्याचे आदेश देणाऱ्या कनिष्ठ न्यायालयाच्या आदेशाला अलाहाबाद उच्च न्यायालयाने मंगळवारी स्थगिती दिली.

मुख्य न्यायदंडाधिकारी विभांशु सुधीर यांनी ९ जानेवारी रोजी दिलेल्या आदेशाविरुद्ध अनुज चौधरी यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती समित गोपाल यांनी हा अंतरिम आदेश दिला. न्यायालयाने स्थगिती देत प्रकरणाची पुढील सुनावणी २४ फेब्रुवारी रोजी ठेवली आहे. हा खटला यामीन यांनी दाखल केलेल्या याचिकेवरून सुरू झाला आहे. यामीन यांचा आरोप आहे की २४ नोव्हेंबर २०२४ रोजी झालेल्या हिंसाचारादरम्यान त्यांच्या मुलावर पोलिसांनी गोळीबार केला होता. यामीन हे संभलमधील खग्गु सराय अंजुमन परिसरातील रहिवासी आहेत.

२४ वर्षीय आलम हा शाही जामा मशिदीच्या परिसरात रस्क आणि बिस्किटे विकण्यासाठी बाहेर होता. त्या वेळी मशिदीच्या परिसरात न्यायालयाच्या आदेशानुसार पाहणी सुरू असताना हिंसाचार उसळला आणि पोलिसांनी गोळीबार केला. यात आलम जखमी झाला, असा आरोप आहे. यामीन यांनी माजी सीओ अनुज चौधरी, माजी निरीक्षक अनुज तोमर आणि अन्य अज्ञात पोलिस कर्मचाऱ्यांविरुद्ध एफआयआर नोंदवण्याची मागणी केली होती. २४ नोव्हेंबर २०२४ रोजी शाही जामा मशिदीच्या परिसरात झालेल्या गोळीबारात पाच मुस्लिमांचा मृत्यू झाला होता.

सीजेएम विभांशु सुधीर यांनी निरीक्षण नोंदवले होते की पोलिस गुन्हेगारी कृत्यांसाठी अधिकृत कर्तव्य या कारणाचे संरक्षण घेऊ शकत नाहीत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांचा संदर्भ देत त्यांनी नमूद केले होते की एखाद्या व्यक्तीवर गोळीबार करणे हे अधिकृत कर्तव्यांच्या कक्षेत बसत नाही. प्रथमदर्शनी दखलपात्र गुन्हा दिसून येत असल्याने, सत्य परिस्थिती समोर येण्यासाठी सखोल तपास आवश्यक असल्याचे सीजेएम न्यायालयाने नमूद केले होते.

## नगरसेवकांचा दिल्ली दौरा पक्ष निधीतून

**तिरुवनंतपुरम :** केरळमधील भाजपने नवनिर्वाचित नगरसेवकांच्या दिल्ली दौऱ्या संबंधीचे आरोप फेटाळून लावले आणि म्हटले की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणानंतर या दौऱ्यासाठी पूर्णपणे निधी देण्यात आला होता. तिरुअनंतपुरम महानगरपालिकेचे महापौर व्ही. व्ही. राजेश यांच्या नेतृत्वाखाली ११५ सदस्यीय शिष्टमंडळ विशेष प्रशासकीय आणि प्रशासन कौशल्य विकास शिबिरात सहभागी होण्यासाठी राष्ट्रीय राजधानीला रवाना झाले.

## फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन १७ पासून भारत दौऱ्यावर



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन १७ फेब्रुवारीपासून तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर येणार आहेत, अशी घोषणा परराष्ट्र मंत्रालयाने मंगळवारी केली.

मॅक्रॉन पंतप्रधान नरेंद्र मोदींशी विस्तृत चर्चा करतील आणि त्याचबरोबर एआय इम्पॅक्ट शिखर परिषदेत सहभागी होतील. दोन्ही नेते विविध क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय सहकार्य मजबूत करण्यावर चर्चा करतील, असे परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे.

याव्यतिरिक्त, नेते इंडो-पॅसिफिकमधील सहकार्यासह परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर चर्चा करतील, असे त्यात म्हटले आहे.

'भारत-फ्रान्स नवोन्मेष वर्ष' चे संयुक्त उद्‌घाटन करण्यासाठी मोदी आणि मॅक्रॉन मुंबईतही असतील, असे परराष्ट्र मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे.

## काँग्रेसी खासदार शशी थरूर यांची केंद्र सरकारवर टीका

# अर्थसंकल्प म्हणजे कारवरील एअरबॅग्जची डागडुजी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** केंद्रीय अर्थसंकल्पाला "अनाठायी" आणि "वाया गेलेली संधी" असे संबोधत काँग्रेस खासदार शशी थरूर यांनी मंगळवारी लोकसभेत सरकारवर तीव्र टीका केली. अपघातग्रस्त कारमधील एअरबॅग्ज पुन्हा नीट लावून प्रवाशांना 'चेसिस मजबूत आहे, नंतर बरे वाटेल' असे सांगण्यासारखी ही अर्थसंकल्पीय मांडणी असल्याची उपमा त्यांनी दिली.

लोकसभेतील अर्थसंकल्पीय चर्चेला सुरुवात करताना थरूर यांनी मिर्झा गालिब यांच्या 'दिल को खुश रखने को ये खयाल अच्छा है' या प्रसिद्ध ओळीचा उल्लेख करत सरकारच्या वक्तृत्व आणि वास्तवातील दरीवर बोट ठेवले. अर्थसंकल्पाची खरी उणीव अंमलबजावणीत असून आश्वासनांचा गजर आणि प्रत्यक्ष परिणाम यांचा मेळ बसत नसल्याचे त्यांनी सांगितले.

हे केवळ 'हेडलाईन मॅनेजमेंट' असल्याचा आरोप करत थरूर म्हणाले की, आश्वासने जोरदार असतात, आकडे भव्य असतात; मात्र प्रत्यक्ष वितरण दिसत नाही. वित्तीय शिस्तीच्या दाव्यांआड एक अस्वस्थ वास्तव लपलेले असून भारतीय राज्य रचनात्मक मजबुतीमुळे नव्हे, तर सक्तीमुळे आकुंचन पावत असल्याचे त्यांनी नमूद केले.

कृषी क्षेत्रातील घोषणांवर टीका करताना त्यांनी या आश्वासनांची तुलना "वचनबद्धतेशिवाय दिलेल्या आधुनिक प्रेमाच्या वचनांशी" केली. यापूर्वीच्या वित्त विधेयकावर टीका करताना दिलेल्या उदाहरणाचा संदर्भ देत त्यांनी सांगितले की, यंदा हॉर्न बंद केला असला तरी गाडी पुढे सरकत नाही, त्यामुळे हा अर्थसंकल्पही वाया गेलेली संधी ठरत आहे.

अर्थसंकल्पाला शहाणपणाचे लेबल लावले जात असले तरी दूरदृष्टी आणि निष्पक्षतेशिवाय ते शहाणपण पोकळ ठरते, असे थरूर म्हणाले. बेरोजगारी, वाढती महागाई आणि असमानता याकडे अर्थसंकल्पाने दुर्लक्ष केले असून सामान्य माणसाच्या संघर्षांना आणि आकांक्षांना तो फारसे उत्तर देत नाही, अशी टीका त्यांनी केली.

सरकार कल्याणकारी योजनांबाबत मोठ्या घोषणा करते; मात्र प्रत्यक्ष खर्चाची आकडेवारी वेगळीच कथा सांगते, असा दावा त्यांनी केला. माध्यमांच्या अहवालांचा दाखला देत थरूर यांनी सांगितले की, गेल्या वर्षी ५३ प्रमुख कल्याणकारी आणि पायाभूत सुविधा योजनांसाठी ५ लाख कोटी रुपयांहून अधिक तरतूद असूनही पहिल्या नऊ महिन्यांत केवळ ४१ टक्के खर्च झाला. जल जीवन मिशन, पीएम स्कूल्स फॉर रायझिंग इंडिया आणि प्रधानमंत्री अनुसूचित जाती अभ्युदय योजना यांसारख्या योजनांमधील अत्यल्प खर्चाकडे त्यांनी लक्ष वेधले.

हे प्रशासन नसून केवळ व्यवस्थापनाचे नाट्य असल्याचे सांगत त्यांनी 'मॉडेल गव्हर्नन्स'च्या दाव्यांची हवा काढली. धोरणे ही निकालांवर आधारित नसून काळजीपूर्वक रचलेले भ्रम असल्याचा आरोप त्यांनी केला. २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न स्तुत्य असले तरी ते साध्य करण्याचा कोणताही विश्वासार्ह आराखडा या अर्थसंकल्पात नाही, असे थरूर म्हणाले.

बेरोजगारी वाढत आहे, गरिबी कायम आहे, नोकऱ्या दुर्मिळ आहेत आणि वेतन स्थिर आहे, अशी स्थिती त्यांनी मांडली. लघुउद्योग अनुपालनाच्या ओझ्याखाली दबले जात असून अनौपचारिक कामगार अधिक असुरक्षित होत आहेत, असा आरोपही त्यांनी केला.